# राष्ट्रीय आरोग्य अभियान
## राज्य आरोग्य सोसायटी, मुंबई

राज्य आरोग्य सोसायटी, मुंबई येथे राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत कंत्राटी तत्वावर खालील पद भरावयाचे आहे.

https://www.nrhm.maharashtra.gov.in & https://www.arogya.maharashtra.gov.in

| पदाचे नाव | नियुक्तीचे ठिकाण | शैक्षणिक अर्हता | कामाचा अनुभव | एकूण भरावयाची रिक्त पदे व जातीचा प्रवर्ग | एकत्रित वेतन/ मानधन |
|---|---|---|---|---|---|
| कार्यक्रम सहाय्यक | राज्य आरोग्य सोसायटी, मुंबई कार्यालय | कोणत्याही शाखेतील पदवीधर त्याचसोबत मराठी टंकलेखन ३० श.प्र.मि. व इंग्रजी टंकलेखन ४० श.प्र.मि. एम.एस.सी.आय.टी किंवा सी.सी.सी | कार्यालयीन कामाचा अनुभव असल्यास प्राधान्य. | अजा-५<br>अज-४<br>वि.जा.(अ)-२<br>भ.ज.(क)-२<br>भ.ज.(ड)-१<br>इमाव-६<br>खुला-१५<br>**एकुण-३५** | रुपये ९,६००/- (प्रतिमाह) |

**टिप:-** १) पदांच्या संख्येत व आरक्षणामध्ये बदल होण्याची शक्यता आहे. २) ही पदे निव्वळ कंत्राटी स्वरुपातील पदे असुन राज्य शासनाची नियमित पदे नाहीत.३) मानधन हे एकत्रित स्वरुपाचे आहे. ४) अर्ज छाननीअंती पात्र उमेदवारांना लेखी परिक्षा/संगणक टंकलेखन चाचणी/ मुलाखती साठी बोलाविण्यात येईल. लेखी परिक्षा/संगणक टंकलेखन चाचणी / मुलाखती साठी पात्र उमेदवारांची यादी तसेच वेळ व दिनांक उपरोक्त संकेत स्थळावर जाहिर करण्यात येईल. ५) निवड झालेल्या उमेदवारांना ११ महिन्या पर्यंत नेमणूक दिली जाईल. प्रकल्प पुढील वर्षी चालु राहील्यास तसेच काम समाधानकारक आढळल्यास एक दिवसाचा खंड देऊन पुढील ११ महिन्यांच्या कालावधीसाठी पुर्ननियुक्ती दिली जाईल. पुर्ननियुक्ती न दिल्यास उमेदवार कोणत्याही स्वरुपाचा दावा करु शकत नाही, किंवा शासकिय नियमित सेवेत सामावुन घेणेबाबत किंवा शासनामार्फत सेवा संरक्षण किंवा सेवा संरक्षण संबंधी दावा करण्याचे अधिकार राहणार नाहीत. ६) राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यरत असलेल्या उमेदवारास वयोमर्यादेमध्ये पाच वर्ष वयाची शिथिलता राहिल. ७) वयोमर्यादा खुल्या प्रवर्गाकरीता ३८ वर्ष व मागासवर्गीयांकरीता ४३ वर्ष राहील. ८) वरील सर्व निकषात बदल करण्याचे अधिकार मा.आयुक्त आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांचे राहतील. ९) उपरोक्त अर्हता धारण करणाऱ्या इच्छुक उमेदवारांनी खालील पत्त्यावर सोबत जोडलेल्या विहित नमुन्यातच अर्ज सादर करावेत. अर्जासोबत शाळा सोडल्याच्या दाखला, शैक्षणिक अर्हता धारण केलेली व अनुभवाची सर्व कागदपत्रे सांक्षांकीत प्रतीसह सादर करणे आवश्यक आहे. जातीचा दाखला (असल्यास) सादर करणे अनिवार्य आहे. विहित नमून्यात सादर न केलेले अर्ज रद्द समजण्यात येतील.१०) अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक २६/०७/२०१८ राहील. अंतिम दिनांकानंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.११) उमेदवारांनी आपला ई मेल आय.डी. चालु ठेवावा, जेणेकरुन पुढील सर्व सुचना त्यांना ईमेल आय. डी. वर देणे सोईचे होईल. तसेच उमेदवारांनी भरती प्रक्रियेच्या माहिती बाबत वर नमूद करण्यात आलेल्या संकेत स्थळांना भेट दयावी.

उमेदवारांनी खालील पत्त्यावर अर्ज सादर करावेत.
मा. आयुक्त आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, आरोग्य भवन, तिसरा मजला, सेंट जॉर्ज हॉस्पिटल आवार, पी.डीमेलो रोड, मुंबई-४०० ००१